दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शनिवार २७ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २५४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# वंचित बहुजन आघाडीची लढाई फक्त भाजपा सोबतच आहे-रेखाताई ठाकूर

## हजारोंच्या संख्येने शक्ती प्रदर्शन करत वंचित बहुजन आघाडीचे









**वादळवार्ता/बीड**

बीड लोकसभा निवडणुक विकासाच्या मुद्या ऐवजी जातीय मुद्द्यावर घसरली असून ओबीसी समाजाच्या नेत्या समजणाऱ्या भाजपाच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज मोठ्या संख्येने विरोध करू लागला आहे. वंचित बहुजन आघाडीची खरी लढाई भाजपासोबत होणार आहे. यामुळे पंकजाताई मुंडे यांच्या पायाखालची जमीन सरकली असून कसल्याही प्रकारच्या वल्गना करून ओबीसी समाजाची मतं घेण्यासाठी त्यांची सुरू असलेली तडफड कामे येणार नाही असे स्पष्ट मत वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या रेखाताई ठाकूर यांनी व्यक्त केले असून येत्या बीड लोकसभा निवडणुकीमध्ये अशोक हिंगे यांचा विजय निश्चित असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. आज गुरुवार दि. २५ एप्रिल २०२४ रोजी भव्य रॅली काढून वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. हजारो समर्थकांच्या उपस्थितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयघोष करत निघालेल्या या रॅलीने बीडकरांचे लक्ष वेधले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून वंचित बहुजन आघाडीच्या या महा रॅलीचा शुभारंभ डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यास अभिवादन करून करण्यात आला. हिरालाल चौक, माळी वेस सुभाष रोड मार्गे अण्णाभाऊ साठे चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून या रॅलीचे प्रस्थान जिल्हाधिकारी कार्यालयाकडे होऊन उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर येथून जवळच असलेल्या पारस नगरीमध्ये भव्य सभेत या रॅलीचे रूपांतर झाले. दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून या रॅलीचा समारोप पारस नगरी येथे करण्यात आला. याप्रसंगी बोलताना रेखाताई ठाकूर पुढे म्हणाल्या की, आम्ही जातीपातीचे राजकारण करीत नाहीत, वंचित बहुजन आघाडीच्या रक्तात देखील जात नावाचा प्रकार येत नाही. आमचं राजकारण विकासावर आधारित आहे. जिल्ह्याचा, विभागाचा आणि राज्यासह देशाचा विकास करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर हे प्रयत्न करीत असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला सर्वधर्मसमभाव पाळणारा भारत देश उभारण्याचे स्वप्न या लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून आम्ही उराशी बाळगलेले आहे. भाजपा महायुतीच्या सरकारने देश विक्रीस काढला आहे. मात्र या धर्मांध शक्तींना रोखण्यासाठी वंचित बहुजन आघाडी प्रयत्नशील राहणार आहे. याप्रसंगी बोलताना वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे म्हणाले की, माझी लढाई फक्त भाजपासोबत आहे. आज हजाराच्या संख्येने माझा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी जमा झालेला वंचित समाज माझ्या विजयाचे प्रतीक आहे. त्यामुळे इतर कोणत्याही पक्षाशी माझी लढाई होईल असा अपप्रचार कोणीही करू नये. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचा विजय निश्चित असल्याचे अशोक हिंगे यांनी याप्रसंगी बोलून दाखवले. या सभेप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष शिस्तपालन व तक्रार समितीचे अध्यक्ष प्रा. विष्णू जाधव, मराठवाडा महासचिव रमेश गायकवाड, इंजि. विष्णू देवकते, जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, महासचिव मिलिंद घाडगे, ज्ञानेश्वर कवठेकर, प्रा. निनाळे, महिला जिल्हाध्यक्ष अँड.अनिता चक्रे, लातूर महिला जिल्हाध्यक्ष मंजूशाताई निंबाळकर, प्रा. डॉ.छायाताई हिरवे, पुष्पा तूरुकमारे, गोरे,नंदा भंडारे, डॉ. नितिन सोनवणे, अनिल डोंगरे, धम्मानंद साळवे, सुरेश पोतदार,अंकुश जाधव, युनुष शेख, दगडु गायकवाड, एस.ए. सोनवणे, पुरुषोत्तम वीर, बालाजी जगतकर, धम्मानंद कासारे, सचिन उजगरे, परमेश्वर लांडगे, अँड.राजेंद्र कोरडे, बाळासाहेब गायकवाड, दिलीप माने, किरण वाघमारे, डॉ.संजय नाकलगावकर, गौतम साळवे, गफार शाहा, लखन जोगदंड, संदीप जाधव, प्रेम जगतकर सूत्रसंचालन अजय सरवदे यांनी केले.यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## भाजपाच्या नेत्यांनी केला ॲड. प्रकाश आंबेडकरांना बीड जिल्ह्यात येण्यास मज्जाव

वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा बीड जिल्ह्यातील दौरा सुनिश्चित असताना भाजपा आणि महायुतीच्या नेत्यांनी सर्व हेलिकॉप्टर बुक करून त्यांना बीड जिल्ह्यात येण्यास मज्जाव केला. असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केला आहे.



डॉक्टर ज्ञानेश्वर गिलबिले यांचा वाढदिवस साजरा करताना संघर्ष लढा ग्रुप माजलगाव

## विजय विकास सामाजिक संस्था आयोजित काता व कुमिते कराटे स्पर्धेत विद्यार्थ्यांचे सुयश.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

विजय विकास सामाजिक संस्था ( All style karate federation) च्या वतीने मोहपाडा रसायनी साई मंदिर येथे झालेल्या काता आणि कुमिते कराटे स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सुयश मिळविले.काता कराटे व कुमिते कराटे प्रकारात उत्तम कामगिरी केलेले विद्यार्थी खालीलप्रमाणे :-

१)आशीर्वाद सिंग काता प्रकारात गोल्ड मेडल व कुमिते प्रकारात सिल्वर मेडल
२) साईराज कडू काता कुमिते गोल्ड मेडल
३) आराध्य झावरे काता कुमिते गोल्ड मेडल
४)शुभम घोगरे काता कुमिते गोल्ड मेडल
५) अथर्व फड कुमिते गोल्ड मेडल काता सिल्वर मेडल
६) आशिष सिंग कुमिते गोल्ड मेडल काता सिल्वर मेडल
७) आदित्य अहिरे काता कुमीते ब्राँझ मेडल
८) सार्थ म्हात्रे काता कुमिते ब्राँझ मेडल
९) हर्षित देवगड काता गोल्ड मेडल कुमीते सिल्वर मेडल
१०) स्वरा जाधव कुमिते ब्राँझ मेडल काता सिल्वर मेडल



११) भक्ती भोईर काता सिल्वर कुमिते ब्राँझ मेडल
१२) पार्थ घरत काता गोल्ड मेडल कुमिते सिल्वर मेडल
१३) शिवांश सिंग काता गोल्ड मेडल कुमिते सिल्वर मेडल
१४) मृदुल म्हात्रे कुमिते गोल्ड काता सिल्वर पटकाविले.

सिनियर इंस्ट्रक्टर विकास भोईर , सागर कडू , प्रगती भोईर/घरत आणि ज्युनिअर इंस्ट्रक्टर अथर्व प्रफुल्ल घरत या सर्वांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी एकूण १० सुवर्ण पदक, ९ रजत पदक, ८ कांस्य पदक पटकावले .

# शिरूर कासार तालुक्यात बजरंग सोनवणेंचा झंझावाती दौरा अनेक गावांना भेटी देत मतदारांशी संवाद साधणार

**वादळवार्ता/शिरूर कासार**

बीड लोकसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे हे शुक्रवारी (दि. २६) शिरूर कासार तालुक्याचा झंझावाती दौरा करणार असून अनेक गावांना भेटी व कॉर्नर बैठका घेत मतदारांशी सवांद साधणार आहेत.

बीड लोकसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी सर्वसामान्य मतदारांच्या भेटीगाठीवर भर देत सवांद साधत असून मतदारांकडून त्यांना वाढता प्रतिसाद मिळत आहे. मतदारांकडून त्यांचे उस्फूर्तपणे स्वागत होत असून वाढता पाठींब्यावरून बजरंग सोनवणे यांचा विजय निश्चित मानला जात आहे. शुक्रवारी सोनवणे हे शिरूर कासार तालुक्याचा प्रचार दौरा करीत आहेत. त्यानुसार सकाळी ८ वाजता भिल्लारवाडी, सकाळी ८.१५ वाजता जाटनांदूर, सकाळी ९ वाजता उखळवाडी, सकाळी ९.१५ वाजता सवसवाडी, सकाळी ९.३० वाजता चाव्हुरवाडी, सकाळी ९.४५ वाजता वडाळी, सकाळी १० वाजता मदमापुरी, सकाळी १०.३० वाजता पिंपळनेर, सकाळी ११ वाजता सिंदफणा, सकाळी ११.३० वाजता गोमळवाडा, सकाळी ११.४५ वाजता रुपुर, दुपारी १२ वाजता कोळवाडी, दुपारी १२.३० वाजता झापेवाडी, दुपारी १ वाजता कान्होबावाडी, दुपारी १.३० वाजता विघनवाडी, दुपारी २ वाजता राक्षसभुवन, दुपारी ३ वाजता आनंदगाव, दुपारी ३.३० वाजता बावी, दुपारी ४ वाजता ब्रम्हनाथ येळंब, दुपारी ४.३० वाजता नांदेवली, सायंकाळी ५ वाजता निमगाव, सायंकाळी ५.१५ वाजता नारायणवाडी, सायंकाळी ५.३० वाजता वरंगळवाडी, सायंकाळी ५.४५ वाजता आनंदवाडी, सायंकाळी ६ वाजता श्रृंगारवाडी, सायंकाळी ६.१५ वाजता वडाचीवाडी, सायंकाळी ६.३० वाजता तींतरवणी, सायंकाळी ७ वाजता धारेवाडी, सायंकाळी ७.३० वाजता मातोरी या गावांना भेटी देत व कॉर्नर बैठका घेऊन मतदारांशी संवाद साधत आपली भूमिका मांडणार आहेत. त्याचबरोबर लोकांचे प्रश्न, समस्या जाणून घेणार आहेत. यावेळी इंडिया आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती त्यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.



संपादकीय

## नवोन्मेषकांचे हित आणि व्यापक सार्वजनिक हित!

(जागतिक बौद्धिक संपदा दिन.) आज जागतिक बौद्धिक संपदा दिन आहे. जसे सोने, दागिने, मालमत्ता ही जशी संपत्ती असते, त्याचप्रमाणे स्वतःची बुद्धिमत्ता हीदेखील संपत्ती म्हणून ओळखली जाते. त्या संपत्तीचेही संरक्षण, संवर्धन आणि उपयोजन निटपणे केले पाहिजे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित मार्गदर्शक लेख... संपादक.

जागतिक बौद्धिक संपदा दिवस दरवर्षी २६ एप्रिल रोजी पेटंट, कॉपीराइट आणि ट्रेडमार्कबद्दल जागरुकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. जागतिक बौद्धिक संपदा संघटना- डब्ल्यूआईपीओद्वारे सन २००० साली या दिवसाची स्थापना करण्यात आली. जागतिक बौद्धिक संपदा दिवस आम्हाला कल्पकता आणि सर्जनशीलता साजरे करण्यास मदत करतो, ज्यामुळे आम्हाला आमच्या जगासाठी निर्माते आणि शोधकांनी केलेले योगदान माहिती होतात. या दिनानिमित्त जगभरात अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. याकडे वेगवेगळ्या प्रकारे पाहिले जाते. कारण लोकांमध्ये भिन्न बौद्धिक गुण असतात जे त्यांच्यासाठी महत्त्वाचे असतात. हे कार्यक्रम सर्व प्रकारचे मूळ कार्य प्रदर्शित करतात, जे पुढील पिढीला विचार करण्यास आणि तयार करण्यास प्रेरित करतात. सर्जनशीलता ही अशी शक्ती आहे, जी समाजाच्या आधुनिकीकरण आणि विकासाकडे नेणारी आहे. नवकल्पनांमुळे आपले जीवन सोपे आणि अधिक आरामदायक बनते.

आज जागतिक बौद्धिक संपदा दिन आहे. जसे सोने, दागिने, मालमत्ता ही जशी संपत्ती असते, त्याचप्रमाणे स्वतःची बुद्धिमत्ता हीदेखील संपत्ती म्हणून ओळखली जाते. जागतिक बौद्धिक संपदा दिनानिमित्त वाङ्मयचौर्याच्या इतिहासाविषयी काही गोष्टी जाणून घेऊया. वाङ्मयचौर्य म्हणजेच प्लॅजेरिझम होय. प्लॅजेरिझम हा शब्द प्रथमतः पहिल्या शतकामध्ये आलेला आढळतो. मूळ लॅटिन असणारा प्लेजिअरिअस हा शब्द आहे. याचा अर्थ अपहरणकर्ता असा होतो. एखाद्याच्या सृजनात्मक कामाचे अपहरण करणे म्हणजे प्लॅजेरिझम होय. प्लेजिअम म्हणजे चोरी करणे. इंडो-युरोपियन भाषांमध्ये प्लेजचा अर्थ जाळे किंवा सापळा असा होतो. एखाद्याला नकळतपणे जाळ्यात पकडले जाते. या अर्थाने प्लेजिअरिअस हे परिष्कृत रूप बनले गेले आणि तसे करण्याची वहिवाट म्हणून प्लेजिअरिझम ही संज्ञा आली असावी. ग्रीक, लॅटीननंतर नंतर १६०१ साली बेन जॉन्सन या नाटककार-समीक्षकाने साहित्यचोराला उद्देशून प्लेजिअरी हा शब्द उपयोगात आणला. इंग्रजीमध्ये प्लेजिअरिझम ही संज्ञा सन १६२०च्या दरम्यान स्वीकारण्यात आली. सॅम्यूएल जॉन्सनने त्याच्या सन १७५५ साली प्रकाशित झालेल्या शब्दकोशात प्लेजिअरीच्या " अ थीफ इन लिटरेचर, वन हू स्टील्स दी थॉट्स ऑर रॉईटिंग्ज ऑफ अनादर", "दी क्राईम ऑफ लिटररी थीफ्ट" अशा व्याख्या दिल्या आहेत. ऑक्सफर्ड शब्दकोशात लॅटीन प्लेजिअरिअस हा शब्द सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात आल्याचे म्हटले आहे.

**संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**7775041086.**

# मांडवे बुद्रुक येथे जागतिक हिवताप दिन साजरा

## शून्य हिवताप रुग्ण हेच आमचे ध्येय



**दैनिक वादळ वार्ता**
**जळगाव/संजय जटाळे**

जामनेर - तालुक्यातील मौजे मांडवे बुद्रुक येथे २५ एप्रिल रोजी जागतिक हिवताप दिन म्हणून साजरा करण्यात आला व उपस्थित आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांनी हिवतापाबद्दल सखोल माहिती जनजागृती व मार्गदर्शन खालील प्रमाणे केले. हिवताप हा किटकजन्य आजार असुन अनेक आजारांपैकी एक गंभीर व मानवाचा जीवघेणा आजार आहे. भारतात प्लाझमोडियम व्हायव्हँक्स व प्लाझमोडियम फँल्सीफेरम हे दोन प्रकारचे रोगजंतु आढळतात. या रोगाचे प्रमुख खाद्य हे मानवी रक्तातील तांबड्या रक्तपेशीतील हिमोग्लोबीन आहे. या रोगजंतुमुळे हिवताप हा आजार होतो. हिवताप आजाराचा शोध लागलेला नव्हता तोपर्यंत या आजाराबाबत समाजात अनेक गैरसमज पसरलेले होते व त्यावर योग्य तो उपचार माहित नसल्यामुळे त्यावेळी हिवतापमुळे अनेक लोक मृत्युमुखी पडत होते. सर्वप्रथम सन 1889 मध्ये डॉ. सर रोनाल्ड रॉंस यांनी रोग जंतुचा शोध लावला. त्यामुळे हिवतापाच्या रुग्णांवर योग्य उपचार देणे शक्य होऊन हिवतापामुळे होणाऱ्या मृत्युंची संख्या कमी झाली. 25 एप्रिल हा दिवस जागतिक हिवताप दिवस म्हणुन जगभरात साजरा केला जातो.हिवतापाचा प्रसार अँनाफेलीस ह्या जातीच्या डासांच्या मादींमार्फत होतो. ह्या मादी स्वच्छ पाण्यात अंडी घालतात.त्यांत पाण्याच्या टाक्या,हौद,डबके,नारळाच्या करवंट्या,कुलर,टायरे,फुलदाण्या आदी ठिकाणी ही मादी अंडी घालतात. हिवतापाला रोखायचे झाल्यास डासांची उत्पत्ती रोखणे हाच त्यावर रामबाण उपाय आहे. डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी आठवड्यातुन एक दिवस कोरडा पाळुन घरातील पाण्याची भांडी घासुन-पुसुन कोरडी करणे,पाण्याच्या टाक्यांवर घट्ट झाकणे ठेवावी,परिसरातील साचलेल्या पाण्याची डबकी बुजवावीत अथवा त्यांत ऑईल किंवा रॉंकेल टाकावे,डबक्यांमध्ये गप्पी मासे सोडावीत.आरोग्य विभागामार्फत कंटेनर्स सव्हेक्षण करुन पाण्याच्या टाक्यांमध्ये टेमीफॉस नावाचे औषध टाकले जाते.त्यामुळे डासांच्या अंडी मरुन जातात.जळगाव जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर व जळगाव जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. तुषार देशमुख यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार व जामनेर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेश सोनवणे तसेच तालुका हिवताप पर्वेक्षक श्री. प्रवीण दाभाडे व श्री.अण्णा जाधव श्री. विक्रम राजपूत आरोग्य सहाय्यक यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक हिवताप दिन साजरा करण्यात आला.सदरप्रसंगी उपकेंद्र मांडवे बुद्रुक येथील डॉ. वैभव पाटील, डॉ.विवेक जाधव,आरोग्य सेवक श्री. हेमंत पाटील, श्री. मनोज परदेशी, आशा सेविका अलका सपकाळ,तुळसाबाई चव्हाण, सुलोचना शिंदे, जिजाबाई पाटील तसेच गावातील सरपंच श्री. महेबूब तडवी, उपसरपंच समिना तडवी, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक व गावातील नागरिकांनी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली.

# १ मे जागतीक कामगार दिनी परळी येथे कामगारांचा मेळावा- प्रा. खाडे. बी.जी.

**वादळवार्ता/परळी**


१ मे जागतीक कामगार दिनानिमीत परळी येथे 'आर्य समाज मंदिरच्या हॉल मध्ये दुपारी १२ वाजता परळी तालुक्यातील कामगारांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

मेळाव्याचे उद्घाटन अर्थशास्त्र तज्ञ, कामगारांच्या प्रश्नांची सखोल जाण असणारे रोहिदास जाधव करणार आहेत. दरवर्षी १मे कामगार दिन परळी येथे साजरा केला जातो व तज्ञ कामगार नेत्यांकडून मार्गदर्शन केले जाते.

मेळाव्यात देशातील कामगारांची परिस्थिती, राज्यातील कामगारांची परिस्थिती व जिल्हयातील कामगारांच्या प्रश्नांवर सखोल मार्गदर्शन होणार आहे. कामगारांनी वर्षभर दिलेले लढे, मिळालेले यश व न सुटलेले प्रश्न तसेच राज्यसरकार व केंद्र सरकारची भूमीका याबद्दल तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. मेळाव्यात शेतकरी नेते मुरलीधर नागरगोजे, कामगार नेते कॉ. प्रभाकर नागरगोजे व सीटू अध्यक्ष प्रा-बी जी खोड यांचे मार्गदर्शन होणार आहे. परळी तालुक्यातील बांधकाम कामगार, आशा कार्यकर्ती, शालेय पोषण आहार कामगार, नगरपालिका कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष प्रा.बी.जी खाडे, आशा' चे नेते किरण सावजी, जालिंदर गिरी, प्रकाश वाघमारे व शेख जावेद यांनी केले आहे.

# अमरावती, वर्ध्यासह काही ठिकाणी ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड

## मतदानावेळी कोणताही अनूचित प्रकार घडू नये म्हणून मोठा पोलिस बंदोबस्त




**दैनिक वादळ वार्ता/ विशेष** महाराष्ट्र राज्यातील ८ लोकसभा मतदारसंघात आज दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार होत आहे. सकाळी ७ वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. सकाळच्या सुमारास मतदान करण्यासाठी नागरिकांनी मतदान केंद्राबाहेर मोठी गर्दी केली मतदानावेळी कोणताही अनूचित प्रकार घडू नये म्हणून मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. दरम्यान, मतदानाला सुरुवात झाल्यानंतर काही वेळात अनेक ठिकाणी ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याचे दिसून आले. अमरावती, अकोला, नांदेड आणि वर्ध्यात ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती आहे. त्यामुळे मतदान केंद्राबाहेर लांबच लांब रांगा लागल्या. ईव्हीएममध्ये बिघाड होताच निवडणूक अधिकाऱ्यांची मोठी तारांबळ उडाली नांदेडमध्ये सुमारे दीड तासांपासून मतदान यंत्र बंद असल्याची माहिती मिळत आहे. सावरगाव निपाणी या गावामधील हा प्रकार आहे. यामुळे सध्या मतदान प्रक्रिया थांबल्याचं समजत आहे. साम टीव्हीने याबाबतचं वृत्त दिलं आहे. वर्ध्याच्या देवळी येथे EVM मशीन बंद पडल्यामुळे मतदान प्रक्रिया थांबली आहे. मशीनच बंद पडल्यामुळे कोणीही मतदान करू शकलेलं नाही. अखेर, अधिकाऱ्यांनी मशीन पुन्हा सुरू मतदानास देखील सुरुवात झाली आहे. अमरावतीच्या वडरपुरा भागातील मतदान केंद्रावर देखील EVM मशीनमध्ये बिघाड झाल्याचं समोर येत आहे. 15 मिनिटे ही मशीन बंद होती. यानंतर अधिकाऱ्यांनी मशीन सुरू केली महाराष्ट्रातील ८ लोकसभा जागांसाठी आज मतदान बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ- वाशीम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या ८ लोकसभा मतदारसंघांत आज मतदान पार पडत आहे

## अंबाजोगाई बसस्थानकातून महिला अधिका-याचे सहा तोळे सोन्याचे दागिने लंपास

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**

नातेवाईकाचे लग्न लावून लातूरला जाण्यासाठी निघालेल्या महिला बालविकास कार्यालयातील महिलेच्या पर्समधील पावणेदोन लाखांचे दागिने अंबाजोगाई बसस्थानकात चोरट्यांनी लंपास केले. ही घटना रविवारी (दि.२१) सायंकाळी घडली पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लातूर येथील महिला बालविकास कार्यालयात कार्यरत असलेल्या सीमा सुग्रीव इंगळे (रा. खोरे गल्ली, लातूर) या नातेवाईकच्या लग्नासाठी अंबाजोगाई तालुक्यातील पूस येथे आल्या होत्या. लग्न आटोपून लातूरला परत जाण्यासाठी त्या सायंकाळी पच वाजताच्या सुमारास अंबाजोगाई बसस्थानकात आल्या. तिथे तोंडाळ स्कार्फ बांधलेल्या एका महिलेने त्यांच्याजवळ येत तुमच्या गळ्यातील सोने बॅगेत ठेवा, बसस्थानकावर खूप गर्दी



आहे असे सांगितले. त्यामुळे सीमा इंगळे यांनी त्यांच्याजवळील सोन्याचे गंठन, नथ, अंगठी, मणीमंगळसूत्र आणि चांदीची चैन असे एकूण पावणेदोन लाख रुपये किमतीचे सहा तोळे सोन्याचे दागिने स्वतःजवळील बॅगेतील डब्ब्यात ठेवले. त्यानंतर लातूरला जाणार्या बसमध्ये चढताना ती महिला त्यांच्या समोरच होती, दुसरी एक स्कार्फ बांधलेली महिला मागे थांबून त्यांना अडथळा निर्माण करत होती. बसमध्ये चढून सीटवर बसल्यानंतर सीम आयंनी बॅग तपासली असता दागिने चोरी गेल्याचे आढळून आले. बसस्थानकावरील सीसीटीव्ही तपासला असता पाठीमागे असणाऱ्या महिलेनेच चोरी करून पळ काढल्याचे दिसून आले. याप्रकरणी सीमा इंगळे यांच्या फिर्यादीवरून अनोळखी महिलेवर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला

## आज तांदळवाडी येथे ह भ प संजय महाराज पाचपौर यांचे किर्तन

**वादळवार्ता/शिरूर कासार**

प्रातःस्मरणीय संत वामनभाऊ महाराज यांनी प्रारंभ केलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचा फिरता नारळी सप्ताहाचे हे ९२ वर्ष बीड जिल्ह्यातील तांदळवाडी भिल्ल येथे संपन्न होत असून आज दिनांक २५ एप्रिल रोजी रात्री आठ ते दहा विदर्भ रत्न रामायणाचार्य ह भ प संजय महाराज पाचपोर अकोला यांचे जाहीर हरी किर्तन होणार असून या कीर्तनाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन तांदळवाडी भिल्ल जि बीड यांनी केले आहे

सकाळी काकडा भजन गाथा गाथा भजन प्रवचन हरिपाठ श्रीमद्



भागवत कथा व रात्री आठ ते दहा जाहीर हरी कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे दुपारी दोन ते पाच अनंत विद्या विभूषित श्री १००८ उत्तम स्वामीजी महाराज यांच्या मुखर्विंधातून श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे हरिपाठ होऊन रात्री आठ ते दहा विदर्भ रत्न रामायणाचार्य ह भ प संजय महाराज पाचपोर अकोला यांचे कीर्तन होणार आहे व त्यानंतर जागर होऊन या सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री क्षेत्र गहिनीनाथ संस्थांचे मठाधिपती ह भ प गुरुवर्य विठ्ठल महाराज व सर्व ग्रामस्थ तांदळवाडी भिल्ल जिल्हा बीड यांनी केले आहे

# कुणब्याच्या पोराचे जातीचे प्रमाणपत्र सभेत दाखविण्यापेक्षा विकास कामाचे कागदपत्रे दाखवावित

## इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणेंचे खुले आव्हान

**वादळवार्ता/बीड** मला मिळालेले कुणबी जातीचे प्रमाणपत्र हे मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या लढ्याचे यश आहे. पालकमंत्र्यांनी कुणब्याच्या पोराचे जातीचे प्रमाणपत्र भर सभेत दाखवून अपमान केला. त्यांनी स्वतः व दोन्ही ताईंनी केलेल्या विकास कामाचे कागदपत्रे दाखवली पाहिजेत. असे खुले आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी केली आहे.

बीड लोकसभेच्या निवडणुकीसाठी भाजप व महायुतीकडून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर झालेल्या जाहीर सभेत बोलताना पालकमंत्र्यांनी शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांचे कुणबी मराठा जातीचे प्रमाणपत्र भर सभेत दाखवून त्यांच्यावर एकेरी भाषेत टीका केली होती. या टिकेबद्दल प्रसार



माध्यमांशी बोलताना बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले की, या राज्याचे कृषिमंत्री व जिल्ह्याच्या पालकमंत्री महोदयांनी भर सभेत कुणबी जातीचे प्रमाणपत्र दाखवून मराठा व कुणबी मराठ्यांचा अपमान केलेला आहे. मला मिळालेले कुणबी मराठा जातीचे प्रमाणपत्र हे मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या लढ्याचे यश आहे. आजी - माजी पालकमंत्र्यांनी माझे कुणबी मराठा जातीचे प्रमाणपत्र सभेत दाखविण्याऐवजी त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या विकास कामांची कागदपत्रे दाखवायला हवी होती. मी जन्माने कुणबी मराठा आहे, मात्र खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत मी इतर मागासवर्गीय प्रवर्गातून एका माळी समाजाच्या व्यक्तीला निवडून आणून न्याय दिला. कुणबी जातीच्या प्रमाणपत्रावरून राजकारण करणे हे चुकीचे आहे. असे ही ते म्हणाले.

बीड लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात उमेदवारांवर टीकेची झोड उठवून आरोप - प्रत्यारोपणाने वातावरण तापले आहे. जनतेचे विकास कामाच्या मुद्द्यावरील लक्ष विचलित करण्यासाठी वैयक्तिक पातळीवर टीका टिप्पणी करून मनोरंजन केले जात आहे. तर सत्ताधारी खासदारांनी आपल्या दहा वर्षाच्या कार्यकाळात विकास निधी खर्च न केल्याने निधी परत गेल्याच्या मुद्द्याला धरून बजरंग सोनवणे यांचा विरोधकांना तोंडघशी पाडण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे जनता विकासाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी पक्षाला कोंडीत पकडणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# संविधान बदलण्याचे जाहीर वक्तव्य करणाया भाजपावर संविधान रक्षकांनी मतदानाद्वारे हल्ला करावा-ॲड.सिद्धार्थ शिंदे

**वादळवार्ता/बीड**

आर.एस.एस. आणि भाजपाचा जन्मच मनुस्मृती आणण्यासाठी आणि भारतीय संविधान बदलण्यासाठी झालेला आहे. २०१४ च्या पुर्वी हा छुपा अंजेंडा होता. भाजपा सत्तेवर आल्यानंतर त्यांच्या पोटातील शब्द जाहीरपणे तोंडात येत आहेत अशी माहिती पत्रकाद्वारे संविधान रक्षकचे संयोजक ॲड.सिद्धार्थ शिंदे यांनी दिली आहे. प्रसिद्धी पत्रकामध्ये असे म्हटले आहे की, भाजपा सत्तेवर आल्यानंतर जाहीरपणे संविधान बदलण्याची भाषा करु लागलेले आहेत त्यामध्ये भाजपा खासदार अनंतकुमार हेगडे यांनी जाहीर सभेत म्हटले होते की, भाजपा संविधान बदलण्यासाठी सत्तेवर आलेली आहे. सहा महिन्यापुर्वी नरेंद्र मोदींच्या आर्थिक सल्लागार समितीची अध्यक्ष-बिबेक देबरॉय याने एक लेख लिहिला आणि ब्रिटीशकालीन भारतीय संविधान बदलण्याची आवश्यकता आहे असे नमुद करण्याचा लेख लिहिला आहे. केशवानंद भारती वि.केंद्र सरकार हा सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याप्रमाणे संविधानाची चौकट बदलता येत नाही त्यामुळे नवीन संविधान तयार केले पाहिजे असे संकेत राज्यसभेत खासदार रंजन गोगई यांनी केलेले आहे. दि. १३ एप्रिल २०२४ रोजी भाजपा खासदार लल्लूसिंग यांनी त्यांच्या लोकसभेचा प्रचार करत असतांना भाजपाला ४०० पारची आवश्यकता २/३ बहूमतासाठी आवश्यक आहे त्यामुळे भारतीय संविधान बदलणे सोपे होईल त्यासाठी ४०० खासदार निवडून आणा असे जाहीर आवाहनच खासदार लल्लूसिंग यांनी केलेले आहे. भारतीय सैनिक ज्याप्रमाणे आपला प्राण तळहातावर घेवून सरहद्दीचे आणि देशाचे संरक्षण करतो त्याप्रमाणे सर्व संविधान रक्षक आणि भीम सैनिकांनी मतदानाद्वारे हल्ला करुन भाजपाचा पराभव आणि इंडिया आघाडीचा विजय भरघोस मतांनी करावा असे आवाहन संविधान रक्षकचे संयोजक ॲड.सिद्धार्थ शिंदे, बीड यांनी केलेले आहे.



## गेवराईत वादळी वारे व आवकाळी पावसाचा तडाखा ठिकठिकाणी शेती व फळबागांचे मोठे नुकसान

**गेवराई / प्रतिनिधी**

बुधवारी सांयकाळच्या सुमारास गेवराई तालुक्याला पुन्हा एकदा वादळी वा-याने जोरदार तडाखा देत ठिकठिकाणी आवकाळी पाऊस झाला.या वादळी वाऱ्यामुळे ठिकठिकाणी छोटी मोठी अनेक झाडे उन्मळून व फांद्या तुटून पडले.तर शेत पिकांसह व फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मागिल पाच सहा दिवसापासून गेवराई तालुक्यात वादळी वारे व आवकाळी पावसाची हजेरी लागत असुन पिंकाचे नुकसान होऊ लागले आहे. ऐन कडाक्याच्या उन्हाळ्यात शेतकरी या सततच्या आवकाळी पावसामुळे चिंताग्रस्त होत असल्याचे दिसून येत आहे.दरम्यान गेवराई व बीड प्रशासनाने वेळात वेळ काढून नुकसानग्रस्त भागातील पिकांचे पंचनामे करुन नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांमधून होऊ लागली आहे. गत आठवड्यापासून गेवराई तालुक्यात एक प्रकारे दररोज सांयकाळ व रात्रीच्यावेळी आवकाळी पावसाची व वादळी वाऱ्याची हजेरी लागत आहे. काल बुधवारी सांयकाळी वादळी वाऱ्याचा जोरदार तडाखा गेवराई तालुक्याला बसला.या तडाक्यात ठिकठिकाणी अनेक छोटी मोठी झाडे उन्मळून पडत फांद्या तुटल्या,तर कुडांच्या घराचे मोठे नुकसान होऊन अनेक घरावरिल पत्रे देखील उचकटली आहेत.तसेच रात्री मध्यम स्वरुपाच्या पावसाची झड सुरु होती.वादळी वारे व आवकाळी पावसामुळे गेवराई तालुक्यातील पिकांसह फळबागांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. रात्री उशिरापर्यंत गेवराई तालुक्यातील अनेक गावात पावसाची रिपरिप सुरुच होती.सध्या गेवराई व बीड जिल्हा प्रशासन लोकसभा निवडणुकीत व्यस्त असुन प्रशासनाने काहीसा वेळ काढून नुकसानग्रस्त भागातील पिकांची पाहणी व पंचनामे करुन नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांमधून होऊ लागली आहे. दरम्यान ऐन कडाक्याच्या उन्हाळ्यात दररोज आवकाळी पावसाची व वादळी वाऱ्याची हजेरी लागत असल्याने सध्या गेवराई तालुक्यातील शेतकरी चिंताग्रस्त असल्याचे दिसुन येत आहे.



## आज तांदळवाडी येथे ह भ प आसाराम महाराज यांचे किर्तन



**वादळवार्ता/शिरूर कासार**

प्रात:स्मरणीय संत वामनभाऊ महाराज यांनी प्रारंभ केलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचा फिरता नारळी सप्ताहाचे हे ९२ वर्ष बीड जिल्ह्यातील तांदळवाडी भिल्ल येथे संपन्न होत असून आज दिनांक २५ एप्रिल रोजी रात्री आठ ते दहा ह भ प आसाराम महाराज आळंदी देवाची यांचे जाहीर हरी किर्तन होणार असून या कीर्तनाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन तांदळवाडी भिल्ल जि बीड यांनी केले आहे सकाळी काकडा भजन गाथा गाथा भजन प्रवचन हरिपाठ श्रीमद् भागवत कथा व रात्री आठ ते दहा जाहीर हरी कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे दुपारी दोन ते पाच अनंत विद्या विभूषित श्री १००८ उत्तम स्वामीजी महाराज यांच्या मुखर्विंधातून श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे हरिपाठ होऊन रात्री आठ ते दहा ह भ प आसाराम महाराज बडे आळंदी देवाची यांचे कीर्तन होणार आहे व त्यानंतर जागर होऊन या सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री क्षेत्र गहिनीनाथ संस्थांचे मठाधिपती ह भ प गुरुवर्य विठ्ठल महाराज व सर्व ग्रामस्थ तांदळवाडी भिल्ल जिल्हा बीड यांनी केले आहे

# मेंटेनन्सच्या नावारवाली महावितरण दिवसभर बत्तीगुल करु लागले.... गेल्या आठवड्यापासून बार्शी रोड सहा ते आठ तास बत्ती गूल करु....

## पार,दुरुस्ती काम करण्यास महावितरण सपशेल फेल,नागरिक वैतागले....

**उन्हाचा पारा चाळिशी**
**वादळवार्ता/बीड**

बीड शहरात बार्शी रोड सह अनेक भागात मेंटेनन्सच्या,फॉल्टच्या नावाखाली दिवसभर लाईट बंद केली जाते,त्यामुळे नागरिक वैतागले असून एन उन्हाळ्यात महावितरणने मेन्टेनच्यां नावाखाली दिवसभर बत्ती गुल केल्याने उकाड्याने नागरिक हैराण झाले असून, महावितरण वर संताप व्यक्त करत आहेत. शहरात बऱ्याच ठिकाणी मुख्यचौक,गल्ली मध्ये उघड्या DP मुळे नागरिकांना,मुक्या प्राण्यांना धोका होतो,तसेच काही भागात तारा लोबकल्या असून त्याकडे महावितरन दुर्लक्ष होत. सध्या अवकाळी पाऊस पडल्याने,वादळ वारा सुरू आहे,त्यामुळे काही खांब पडले, वाकल्याने कारण सांगत दिवसभर लाईट बंद केली जाते. उघड्या DP मुळे धोका लहान बालके,मुकी जनावरे तसेच नागरिकांना याचा धोका निर्माण झाला असून याकडे महावितरण दुर्लक्ष करत आहे. एखादी जीवितहानी झाली तर महावितरणच जबाबदार असेल. बीड शहरातील पेठ बीड ,बार्शी नाका,ढगे कॉलनी,बार्शी रोड मोमीनपुरा,कंकालेश्वर मंदिर परिसर,या भागात तर दिवसभर बत्ती गुल असते संबधीत अभियंता यांना विचारलं असता ते उडवा उडवी चे उत्तर देतात,त्यामुळे नागरिकांत संताप व्यक्त होत असून भगवान बाबा प्रतिष्ठान मधील नागरिक शिष्टमंडळ सोमवारी महावितरण च्या कार्यालय अधीक्षक याची भेट घेऊन विधुत पुरवठा सुरळीत करावा म्हणून भेट घेणार आहे.

मेंटेनन्स च्या नावाखाली परमिट पेक्षा जास्त वेळ लाईट बंद करून मेंटेनन्सचे कारण सांगण्यात येत आहे. बीड शहरातील मिसाळ यांनी स्वतः लक्ष घालून विद्युत पुरवठा सुरळीत करावा अन्यथा दृष्ट ठाकरे तक्रार करण्यात येईल असा इशारा या भागातील नागरिकांनी दिला आहे.या भागातील अभियंता यांना वेळोवेळी माहिती देऊन देखील जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत असा आरोप स्थानिक रहिवाशी करत आहेत.या भागात बऱ्याच खांबावरील तारा ह्या लोम्बकळया,खांब वाकले असून त्याची दुरुस्त करावी अशी मागणी नागरिकातुन होत आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )